अर्थसंकल्पिय अनुदान २०१७-२०१८
“२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ,१९६जिल्हा परिषद/ पंचायत संस्थांना सहाय्य - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१, याच्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने - (स्थानिक क्षेत्र) (०१)(०७)नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारीवर्ग (२२१५ १९१४)”
मागणी क्रमांक वाय-२

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
### शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२९/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ३ फेब्रुवारी, २०१८

**वाचा :**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल,२०१७
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून,२०१७
३) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२९/पापु-२३, दि. १५ एप्रिल, २०१७
४) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२९/पापु-२३, दि. २९ जून, २०१७

**प्रस्तावना:**

जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारी वर्ग यांचे वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२ “२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९६, जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य (जिल्हा स्तर) (०१) जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने-(स्थानिक क्षेत्र) (०१)(०७) नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारी वर्ग (२२१५ १९१४)” या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०१७-२०१८ करिता ३६,सहायक अनुदाने (वेतन) साठी रुपये १०,१६,१०,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी सोळा लाख दहा हजार फक्त) व ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) साठी रुपये ८,५०,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख पन्नास हजार फक्त ) असा एकूण रुपये १०,२४,६०,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी चोवीस लाख साठ हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. सदर तरतुदीपैकी ३६, वेतन व ३१, वेतनेतर साठी एकूण रुपये १,८६,७४,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी श्याऐंशी लाख चौ-याहत्तर हजार फक्त) इतके अनुदान वाचा मधील अनुक्रमांक

२ च्या शासन निर्णयान्वये तसेच रुपये ४,५१,१८,०००/- ( अक्षरी रुपये चार कोटी एक्कावन्न लाख अठरा हजार फक्त ) इतका निधी वाचा मधील अनुक्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये संबंधित सर्व जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आले आहे. आता जिल्हा परिषदांकडून अतिरिक्त निधीसंदर्भात प्राप्त झालेल्या मागण्या व त्यांनी आत्तापर्यन्त केलेला खर्च विचारात घेऊन जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारीवर्ग यांचे वेतनाचा खर्च भागविण्यासाठी लेखाशिर्ष २२१५ १९१४ अंतर्गत ३६, वेतन साठी एकूण रुपये ९८,७२,३१८/- (अक्षरी रुपये अठ्ठयाण्णव लाख बाहत्तर हजार तीनशे अठरा फक्त ) इतक्या निधीचे वाटप जिल्हा परिषदांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

## शासन निर्णय:

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९६, जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य (जिल्हा स्तर) (०१) जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने-(स्थानिक क्षेत्र) (०१)(०७) नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारीवर्ग (२२१५ १९१४) " या लेखाशिर्षाखाली ३६, सहायक अनुदाने (वेतन) साठी रुपये ९८,७२,३१८/- (अक्षरी रुपये अठ्ठयाण्णव लाख बाहत्तर हजार तीनशे अठरा फक्त ) इतके अनुदान मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला, यवतमाळ यांना पुढीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | सन २०१७-२०१८ करीता या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेले वेतन अनुदान | लेखाशिर्ष २२१५ १९१४ खाली वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (अक्षरी रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ३५००००० | रूपये पस्तीस लाख फक्त |
| २ | रत्नागिरी | २०००००० | रूपये वीस लाख फक्त |
| ३ | सातारा | १००००० | रूपये एक लाख फक्त |
| ४ | जालना | ९६२३१८ | रूपये नऊ लाख बासष्ठ हजार तीनशे अठरा फक्त |
| ५ | अकोला | ५००००० | रूपये पाच लाख फक्त |
| ६ | यवतमाळ | २८१०००० | रूपये अठ्ठावीस लाख दहा हजार फक्त |
| | एकूण | ९८७२३१८ | रूपये अठ्ठ्याण्णव लाख बाहत्तर हजार तीनशे अठरा फक्त |

२. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेले अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहील. वितरीत केलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची

दक्षता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

३. वित्त विभागाने संदर्भाधीन दि.३०.६.२०१७ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये इसीएस द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व ऑफलाईन पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ “२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९६, जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य (जिल्हा स्तर) (०१) जिल्हा परिषद/पंचायत संस्थांना सहाय्य महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने-(स्थानिक क्षेत्र) (०१)(०७) नियमित आस्थापनेवरील रोजंदारीवर काम करणारा कर्मचारीवर्ग (२२१५ १९१४)” ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्टामधील इतर अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०३१०२६५७१७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: CN = Balasaheb B Hajare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2018.02.03 15:00:20 +05'30'

**बाळासाहेब बा. हजारे**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. विधानसभा / विधान परिषद, सर्व
२. विभागीय आयुक्त, सर्व

३. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला व यवतमाळ
५. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला व यवतमाळ
६. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला व यवतमाळ
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
९. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला व यवतमाळ
१०. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, ठाणे, रत्नागिरी, सातारा, जालना, अकोला व यवतमाळ
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१२. वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)
१३. कार्यासन क्रमांक पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१४. ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१५. निवड नस्ती कार्यासन पापु-२३